# बेस्ट डिटेक्शन ऑफ दि मंथ माहे जुन २०१८

## गुन्हे प्रकटीकरण शाखा, कक्ष—०२,मुंबई.

| | | |
|---|---|---|
| १ | **गु.र.क्र व कलम** | गुप्रशा. गुरक्र. ३३/२०१८ कलम ३९२,३९७,४५२,३४२,३४ भादवि. सह ३,२५ भाहका. सह ३७ (१) (अ) सह १३५ मपोका. (लो.टी.मार्ग पोलीस ठाणे गु.नों.क्र. १६१/२०१८) |
| २ | **गुन्हा घडला दिनांक** | दिनांक २९/०५/२०१८ रोजी १६.३० वा. ते १७.०० वा.चे दरम्यान |
| ३ | **गुन्हयाचे ठिकाण** | रूम नं. ५१, चौथा मजला, ६, महालक्ष्मी मेन्शन, कुंभार तुकडा, भुलेश्वर, मुंबई २ |
| ४ | **फिर्यादी** | श्री प्रकाश रामसेवक मंडल वय ३५ वर्षे, व्यवसाय — व्यापार, रा.ठि. रूम नं. ५१, चौथा मजला, ६, महालक्ष्मी मेन्शन, कुंभार तुकडा, भुलेश्वर, मुंबई २ |
| ५ | **चोरीस गेलेली मालमत्ता** | रोख रक्कम व दोन मोबाईल हॅण्डसेट अशी एकुण रू.१४,५८,०००/—किं.ची मालमत्ता |
| ६ | **हस्तगत मालमत्ता** | रोख रक्कम रुपये २३,०००/— व घटनास्थळाची रेकी व गुन्हा करताना वापरलेले २ मोबाईल फोन व २ सिमकार्ड. |
| ७ | **आरोपी अटक** | १) मोहमंद युनुस सलाउद्दीन काजी वय ४० वर्षे,<br>२) सलाम उर्फ वासीम मोहमद बशीर मोहमद मन्सुरी वय २५ वर्षे,<br>३) राहुल उर्फ मनोज शिवदास गुप्ता वय २७ वर्षे,<br>**दिनांक ०८/०६/२०१८ रोजी २०.०० वा. विजय विहार पोलीस ठाणे, नवी दिल्ली येथुन अटक** |

गुप्रशा. गुरक्र. ३३/२०१८ कलम ३९२,३९७,४५२,३४२,३४ भादवि. सह ३,२५ भाहका. सह ३७ (१) (अ) सह १३५ मपोका. (लो.टी.मार्ग पोलीस ठाणे गु.नों.क्र. १६१/२०१८) या गुन्हयात दिनांक २९/०५/२०१८ रोजी १६.३० वा. ते १७.०० वा.चे दरम्यान रूम नं. ५१, चौथा मजला, ६, महालक्ष्मी मेन्शन, कुंभार तुकडा, भुलेश्वर, मुंबई ०२.याठिकाणी चार अनोळखी इसमांनी फिर्यादींच्या ऑफिसमध्ये घुसुन फिर्यादीस पिस्टलचा व त्यांचे मालकाचे व्यावसायीक मित्र पुजारी यांना चाकूचा धाक दाखवून त्या दोघांचेही हात—पाय रस्सीने व तोंड ओढणीने बांधले. त्यानंतर त्या दोघांच्याही ताब्यातील रोख रक्कम व दोन मोबाईल हॅण्डसेट अशी एकुण रू.१४,५८,०००/—किं.ची मालमत्ता जबरी चोरी करून दरवाजाला बाहेरून कडी लावून पळून गेले. फिर्यादी यांनी तक्रार दिलेवरून दिनांक ३१/०५/२०१८ रोजी सदरचा गुन्हा नोंद करण्यात आला.

गुन्हे प्रकटीकरण शाखा, कक्ष—०२, मुंबई चे पथकाने नमुद गुन्हयाची माहिती मिळताच तपास सुरू केला. सदर पथकाने घटनास्थळी कोणी प्रत्यक्षदर्शी साक्षीदार आहेत का? तसेच घटनास्थळी व आजुबाजुच्या परीसरात सिसिटिव्ही कॅमेरे आहेत का? यादृष्टिने कसुन तपास केला. सदर पथकाने फिर्यादी व साक्षीदार श्री. पुजारी यांची प्रत्यक्ष भेट घेवून गुन्हयाचा संपुर्ण घटनाक्रम समजुन घेतला. सदर पथकाने घटनास्थळाचे परीसरातील सि.सि.टि.व्हि. फुटेज व सेल आय.डी. डम डाटा प्राप्त केला. सदर पथकाने प्राप्त झालेल्या तांत्रिक बाबींची बारकाईने तपासणी केली. सदर पथकाने प्राप्त सि.सि.टि.व्हि. फुटेज मधील संशयीत इसमांना अचुक हेरून त्यांचे परिसरातील हालचालींचे बारकावे शोधुन काढुन त्या अनुषंगाने प्राप्त सेल आय.डी. डम डाटाची तपासणी केली.

सदर पथकाने सेल आयडी डम डाटाचे तपासणीत गुन्हयाचे कालावधीत एकमेकांचे संपर्कात असलेले तीन संशयीत मोबाईल क्रमांक प्राप्त केले. प्राप्त संशयीत मोबाईल क्रमांकाचे सीडीआर मागविण्यात आले असता, नमुद सीडीआर चा अत्यंत बारकाईने अभ्यास केले असता, नमुद क्रमांक हे केवळ गुन्हयादरम्यानचे कालावधीत एकमेकांचे संर्पका पुरतेच मर्यादीत वापरले गेले असल्याचे व त्यानंतर बंद झालेले असल्याचे निष्पन्न झाले. सदर पथकाने प्राप्त सी.डी.आर. ची अधिक बारकाईने तपासणी केली असता, सदर मोबाईलचे सिमकार्ड दिल्ली येथुन

वितरीत झाल्याचे निर्दशनास आले. तसेच गुन्हयाचे पंधरा दिवसापूर्वी दोन दिवसांकरीता सदर मोबाईल क्रमांक धारक मुंबईत येवुन गेल्याचे व त्यांचे संपर्कात एक मुंबईतील मोबाईल क्रमांक असल्याचे दिसुन आले. यावरून सदर पथकाने नमुद मुंबईतील मोबाईल धारकाचा शोध घेवून त्यास कक्ष कार्यालय येथे आणले. नमुद इसमाकडे केलेल्या चौकशीत एका इसमाने लुधियाना येथुन पाठविलेली अंगडीयाची रक्कम नमूद संशयीत मोबाईल धारकाने मुंबईत घटनास्थळी असलेल्या कार्यालयात दिलेली असल्याचे व ती रक्कम पुढे दिल्ली येथे पाठविली असल्याचे समजले.

नमुद गुन्हयातील आरोपींचा केंद्रबिंदु दिल्ली असल्याचे निदर्शनात आल्याने तात्काळ सदरचे पथक दिल्ली येथे रवाना झाले. सदर पथकाने दिल्ली येथे जावुन केलेल्या चौकशीत दिल्ली येथील व्यापाऱ्याने मुंबई येथुन आलेली रक्कम दिल्ली येथील एका मोबाईल धारकास दिल्याचे परंतु नमूद मोबाईल धारक त्याचे परिचीत नसल्याची माहिती प्राप्त झाली. प्राप्त अधिक माहितीच्या आधारे नमुद पथकाने लुधियाना येथे रवाना होवुन लुधियाना येथील व्यापाऱ्यास संपर्क साधुन केलेल्या चौकशीत एक मोबाईल धारकाने मुंबई येथे रक्कम पाठविली असल्याचे परंतु तो एकदाच आल्याचे व तो देखिल परिचीत नसल्याचे समजले.

त्यानंतर सदर पथकाने पुन्हा दिल्ली येथे येवुन सिम कार्ड वितरण झालेल्या ठिकाणास केंद्र बिंदु करून सिमकार्ड वितरकास शोधुन काढले. ताब्यातील सिमकार्ड वितरकाकडे केलेल्या चौकशीत स्थानिक महिलांचे त्याने दोन वेळा अंगठयाचे ठसे घेवुन अतिरिक्त तीन सिम कार्ड एका परिचीत व्यक्तिस त्याने दिल्याचे सांगीतले. सिमकार्ड वितरकाने दिलेल्या पत्त्यावर जावून त्याचे परिचीत व्यक्तिस ताब्यात घेवुन केलेल्या चौकशीत पुढे साखळी वाढत जावुन नमुद गुन्हयामध्ये राहुल शिवदास गुप्ता, हे नाव निष्पन्न झाले. नमुद राहूल गुप्ता याचा राजीव नगर एक्स्टेशन, बेगमपुर, नवी दिल्ली–८६ येथे शोध घेवून त्यास चौकशीकामी ताब्यात घेतले. सदर पथकाने राहूल गुप्ता याचेकडे चौकशी करता, त्याने सदरचे सिमकार्ड मध्य प्रदेश व राजस्थान राज्यातील दोन आरोपीत इसमांना दिले असल्याचे समजले. सदर पथकाने राहूल गुप्ता यास विश्वासात घेवुन त्याचे इतर साथीदारांचे दिल्लीतील ठावठिकाणांची तपासणी  सुरू केली. त्याच दरम्यान  राहूल गुप्ताकडे नविन सिमकार्डची मागणी करण्यास त्याचे साथीदारांनी संपर्क केला असता, सदर पथकाने दिल्ली येथील विजय विहार परिसरामध्ये सापळा रचुन सिमकार्ड नेण्याकरीता आलेल्या इसम नामे मोहमंद युनुस सलाउद्दीन काजी वय ४० वर्षे, सलाम उर्फ वासीम मोहमद बशीर मोहमद मन्सुरी वय २५ वर्षे यांना शिताफीने ताब्यात घेतले. नमुद ताब्यातील आ.क्र. १) मोहमद युनुस सलाउद्दीन काजी वय ४० वर्षे, २) सलाम उर्फ वासीम मोहमद बशीर मोहमद मन्सुरी वय २५ वर्षे व ३) राहुल उर्फ मनोज शिवदास गुप्ता वय २७ वर्षे यांचेकडे स्थानिक पोलीस ठाणे येथे नेऊन केलेल्या चौकशीत त्यांनी प्रस्तुत गुन्हयाची कबुली दिली. सदर पथकाने नमुद तीनही आरोपीतांचा सदर गुन्हयातील सक्रीय सहभाग निष्पन्न झालेवरून त्यांना नमुद गुन्हयात रितसर अटक केली. नमुद आरोपीतांना रिमांडकामी स्थानिक न्यायालयात हजर करून ट्रान्झीस्ट रिमांडद्वारे त्यांना मुंबई येथे आणले. सदर पथकाने गुन्हा तपासावर घेवुन पुढील तपास सुरू केला.

सदर पथकाने अटक आरोपीतांकडे गुन्हयाचे संबंधाने कसुन सखोल चौकशी करता, त्यांनी अंगडीया मार्फत वेग–वेगळया राज्यातुन पैसे पाठवुन पैसे स्विकारण्याच्या बहाण्याने कार्यालयाची रेकी करुन नंतर जबरी चोरी केल्याचे सांगीतले. अटक आरोपीतांकडे सखोल चौकशीअंती गुन्हयातील चोरीस गेलेल्या मालमत्तेपैकी रोख रक्कम रुपये २३,०००/– व घटनास्थळाची रेकी व गुन्हा करताना वापरलेले २ मोबाईल फोन व २ सिमकार्ड अशी मालमत्ता सदर पथकाने हस्तगत केली आहे. तसेच सदर पथकाने अशा प्रकारे गुन्हे करणारी आंतरराज्य टोळी असल्याचे व त्यांचे विरूध्द पूर्वीचे मुंबई, नागपुर, कोलकत्ता, बॅगलोर, जोधपुर अशा ठिकाणी जबरी चोरीचे बरेच गुन्हे दाखल असल्याचे व माणकचौक पोलीस ठाणे, जयपुर, राजस्थान राज्य येथील गुन्हयात सन २०१५ पासुन पाहिजे आरोपी असल्याचे व जयपुर पोलीसांना तेव्हा पासुन गुंगारा देत असल्याचे आरोपीतांकडे केलेल्या चौकशीत निष्पन्न केले.

गुन्हे प्रकटीकरण शाखा, कक्ष–२ पथकाने कोणताही पुरावा नसताना मानवी कौशल्य, तांत्रिक तपास, सिसिटिव्ही फुटेजद्वारे तसेच घटनास्थळ डम–डाटा द्वारे अचुक संशयीत मोबाईल क्रमांक शोधुन अथक परिश्रमाने दिल्ली, हरयाणा, मध्य प्रदेश व राजस्थान अशा राज्यांमध्ये तपास करून अग्निशस्त्राचा वापर करून गजबजलेल्या परिसरात अंगाडीयाचे व्यवसायाचे निमित्ताने रेकी करून रोख रक्कम व दोन मोबाईल हॅण्डसेट अशी एकुण रू. १४,५८,०००/–किं.ची मालमत्तेची जबरी चोरी करणाऱ्या तीन आरोपीतांना परराज्यातुन अटक करून सदर जबरी चोरीचा गंभीर गुन्हा उघडकीस आणला आहे.

सदरच्या गंभीर व संवेदनशील गुन्हयाची कौशल्याने उकल केल्याने **मा. पोलीस आयुक्तांनी त्यांना जुन–२०१८ चे बेस्ट डिटेक्शन ऑफ दि मंथ** अर्थात उत्कृष्ट गुन्हे शोधाचे पारितोषिकाने सन्मानित केले आहे.

**गुन्हे प्रकटीकरण शाखा, कक्ष–०२,मुंबई.तपास पथकातील पोलीस अधिकारी/अंमलदार**

| अक्र. | पोलीस अधिकारी/अंमलदार नांव | अक्र. | पोलीस अधिकारी/अंमलदार नांव |
|---|---|---|---|
| ०१ | पोलीस निरीक्षक प्रशांत पंढरीनाथ राजे | ०५ | पोशिक्र.०३०७६०/प्रमोद शामराव शिर्के |
| ०२ | सहा.पोलीस निरीक्षक सचिन सदाशिव माने | ०६ | पोशिक्र.०३१०३३/राजेश हरिश्चंद्र सोनवणे |
| ०३ | सपोउनिक्र.२०४००/संजीव सोपानराव गुंडेवाड | ०७ | पोशिक्र.०६११६८/प्रशांत रावसाहेब थिटमे |
| ०४ | पोनाक्र.९८०६३६/ऱ्हदयनारायण कन्हैय्यालाल मिश्रा | –– | –– |

--- ooo ---